# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/11/2023 (बुधवार) सायंकाळ

---

## विनयभंग

१) पो.स्टे. खापरखेडा :- दिनांक ०६/११/२०२३ चे ०९.०० वा. ते ०९.३५ वा. दरम्यान यातील **आरोपी नामे- सुरज वाघमारे, वय ३० वर्ष, रा. वार्ड नं. ०१ रायसोनी कॉलेज नेहरपट्टा चिचोली खापरखेडा** याने फिर्यादीचे घराचे आत जाऊन तू मला आवडते मला तुझ्या सोबत लग्न करून संबंध बनवायचे आहे असे म्हणून हात ओढला त्यामुळे फिर्यादीच्या मनाला लज्जास्पद वाटून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४, ३५४ (ए) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एपीआय मलकुवार मॅडम पोस्टे खापरखेडा मो. नं. ९६२३६८७६२७ या करीत आहे.

२) पो.स्टे. काटोल :- दिनांक ३१/१०/२०२३ ते दि. ०७/११/२०२३ दरम्यान फिर्यादी व आरोपी नामे- प्रज्वल भगवत बालपांडे, रा. काटोल हे क्लासमेट असुन ते सन २०२० ते २०२१ दरम्यान रिलेशनशिपमध्ये होते फिर्यादी हिचे शिक्षणमध्ये मन लागल्याने तिने आरोपी सोबत रिलेशनशिप ठेवायचे नसल्याचे सांगितले तरी सुदधा आरोपीने फिर्यादीचे मोबाईल व्हॉट्सपवर रिलेशनशिप ठेवण्याचा मॅसेज करून तुझा सोबत लग्न करायचे आहे. असे म्हटले परंतु फिर्यादीने नकार दिल्याने आरोपीने फिर्यादीला वारंवार मॅसेज करून रिलेशनशिप ठेव नाहीतर आपले खाजगी फोटो फारवड करेल अशी धमकी देवुन फिर्यादीला त्रास देत असल्याचे फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरून गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ डी, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा भारती सुरजुसे मो. क्र. ९७६६१२७५९३ या करीत आहे.

३) पो.स्टे. जलालखेडा :- फिर्यादी/पिडीता यांचे पती हे दि. ०६/११/२०२३ रोजी सायंकाळी ०७/०० वा. कापडाचे दुकानात हजर असता तेथे आरोपी नामे- प्रविण उर्फ बालु जोध रा. लोहारी सावंगा ता. नरखेड जि. नागपुर याने झगडा भांडण केल्यामुळे फिर्यादीचे पती हे पो.स्टेला रिपोर्ट देण्यास निघुन गेले व त्यानंतर प्रविण उर्फ बालु जोध रा. लोहारी सावंगा हा फिर्यादीच्या घरासमोर दारूचे नशेत अंदाजे ०८/०० वा. दरम्यान गेला व शिविगाळी करून जोर-जोरात ओरडत शिवीगाळ करीत निघ घराच्या बाहेर आता तु घरात का लपुन बसला नंतर फिर्यादीने आरोपीला म्हटले की तुम्ही माझ्या पतीला का बर मारले त्याचे कारण सांगा असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या दंडाला पकडुन धक्का देवुन विनयंभग करण्याचा प्रयत्न केला व अश्लील भाषेत शिवीगाळ केली असता फिर्यादीचे सासरे हे वाद सोडविण्यास आले असता त्यांना सुदधा आरोपीने शिविगाळ केली व मोहल्ल्यातील सर्व बाया उभ्या झाल्या असता त्यांना सुद्धा आरोपीने शिविगाळी केली व जाता जाता म्हटले की आता ही सुरूवात झाली अशी धमकी देवुन निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, २९४, ३२३, ५०४, ५०६, ५०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज शेन्डे पोस्टे जलालखेडा मो. क्र. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील प्रकाश नगर कॉलोनी क्वार्टर नंबर एफ ८३/१ येथे फिर्यादी नामे— भूषण अरविंद बदामे, वय ३९ वर्ष, रा. क्वार्टर नंबर एफ ८३/५ प्रकाश नगर कॉलनी खापरखेडा हे दिनांक ०४/११/२०२३ रोजी कॉर्टरचे दाराला कुलूप लावून देवदर्शनाकरिता शेगाव येथे गेले असता दिनांक ०७/११/२०२३ चे सकाळी ६/२० वाजता दरम्यान त्यांच्या बिल्डिंगमध्ये राहणारे प्रकाश टेंभेकर यांनी त्यांना फोन करून सांगितले की तुमचे कॉर्टरचे दाराला कुलूप लागलेले दिसत नसून चोरी झाल्याचे त्यांनी सांगितले व त्यावरून दिनांक ७/११/२०२३ रोजी दुपारी ०२/०० वाजता कॉर्टरकडे आले असता कॉर्टरचे दाराला लावलेले कुलूप दिसले नाही व फिर्यादी व त्याची पत्नी यांनी दार उघडून घरातील सामान पाहिले असता बेडरूम मधील लोखंडी कपाटा मधील लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने १) एक सोन्याची पोत जुनी वजन २९ ग्रॅम किंमती ६०,०००/— रुपये २) एक लेडीज सोन्याची अंगठी वजन २.५० ग्रॅम किंमती १०,०००/— रुपये ३) एक प्लॅटिनम कानातील बाली वजन २.२७० ग्रॅम किंमती १०,०००/— रुपये असा एकूण ८०,०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने कॉर्टरचे दरवाज्याचे कुलूप तोडून आत प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राउत मो. नं. ८५५४९६७९४० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**